Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# माध्यमांसाठी नियमावलीची गरज आहे काय?

**श्री. सुकृत खांडेकर**
**(संशोधक)**
**पत्रकारिता आणि जनसंपर्क विभाग, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**

**डॉ. दिपक ज. टिळक**
**(कुलपती आणि मार्गदर्शक)**
**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**

## विषयाचे स्वरूप -

राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा, संशोधन, विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, वैद्यक सर्व क्षेत्रात नेहमी नवीन घडामोडी घडत असतात आणि प्रसिद्धी व प्रसार माध्यमांच्या मार्फत त्या जनतेपर्यंत पोहचत असते. यातील अनेक घडामोडींच्या वृत्तांताचा जनतेवर तात्काळ किंवा दीर्घकालीन परिणाम होत असतो. अशा वेळी वास्तव आणि सत्यनिष्ठ वृत्तांत माध्यमांकडून अपेक्षित आहे. माध्यमांच्या जीवघेण्या स्पर्धेत आणि ब्रेकिंग न्यूजच्या शर्यतीत अनेक वृत्तांत अंदाजपंचे दिले जातात. काही तर काल्पनिक असतात. जे काही घडलेले नाही ते वाचक किंवा प्रेक्षकांपुढे दडपून सांगितले जाते. सर्व क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या व वाचकांच्या थेट घरात पोचण्याची क्षमता असलेल्या माध्यमांची शक्ती मोठी आहे. पण काल्पनिक व अर्धवट बातम्यांमुळे त्याच्या विश्वासार्हतेचा बुरखा फाटतोय की काय असे वाटू लागले, म्हणूनच माध्यमांना नियमावलीची गरज आहे का? हा विषय शोध निबंधासाठी मी निवडला आहे.

## की वर्ड -

प्रसार व प्रसिद्धी माध्यमे, नैतिकता, नियमावली, ब्रेकिंग न्यूज, टीआरपी

## प्रास्ताविक

माध्यमांना लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हटले जाते. संसदीय लोकशाहीत माध्यमांचे महत्व मोठे आहे, म्हणून माध्यमांना स्वातंत्र्य असले पाहिजे. मात्र स्वातंत्र्याच्या नावाखाली कोणतीही जबाबदारी पाळायची नसेल तर माध्यमांची विश्वसार्हता कशी टिकणार, हा खरा प्रश्न आहे. राज्यकर्ते, सरकार किंवा सत्ताधारी पक्ष त्यांच्यावर अंकुश ठेवण्याचे काम माध्यमांचे आहे. सरकार व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम कारण्यासाठी आम्ही वृत्तपत्र सुरु करीत आहोत, असे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी १८८ वर्षांपूर्वी आपल्या

पहिल्या अंकात म्हटले होते. एकशे एकोणचाळीस वर्षांपूर्वी 'केसरी' वृत्तपत्र सुरु करताना लोकमान्य टिळकांनी आम्ही 'केसरी' का सुरु करीत आहोत हे सांगताना वृत्तपत्राचे काम काय असते हेही सांगितले होते. रस्तोरस्ती दिवे लागलेले असल्याने व पोलिसांची सारखी गस्त फिरत असल्याने जो उपयोग होत असतो, तोच ज्या ज्या जागी, वर्तमानपत्रकर्त्यांची लेखणी सुरु असल्याने होत असतो, असे म्हटले आहे. आजच्या पत्रकारितेचे गांभीर्य कमी होत असून त्यात उथळपणा जास्त येत आहे का? जनतेला योग्य दिशा दर्शन करण्यासाठी आजची पत्रकारिता कितपत न्याय देत आहे?

पेण अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकपासून ते पंजाब - महाराष्ट्र को. ऑप. बँकेपर्यंत राज्यात अनेक बँक घोटाळे बाहेर आले. राज्य सहकारी बँकेचाही पंचवीस हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्यांचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक खाते व अंमलबजावणी महासंचालनालय (ईडी) करीत आहे. बँक ऑफ बडोदा व स्टेट बँक ऑफ इंडिया यांचीही नवे वादात आली. खातेदार व ग्राहक त्यामुळे संभ्रमात पडतात. आपली ठेवी किंवा बचत खात्यातील रक्कम काढून घेणे यासाठी रंग लागतात. नोटबंदीनंतर सारा देश चार महिने बँकांच्या रांगेत उभा होता. माध्यमे वृत्तांत देतात पण त्या मागची कारणमीमांसा व झालेले परिणाम याचा पाठपुरावा करताना दिसत नाही. जनतेला दिलासा आणि प्रशासनावर नजर अशी भूमिका माध्यमांकडून निष्पक्षपणे बजावली जाते, असे चित्र दिसत नाही.

देशात व राज्यात घडामोडींचे वृत्तांत देतानाही माध्यमे कशी भरकटली जातात याचेच दर्शन महाराष्ट्रात गेल्या काही काळात दिसले. शिक्षण, वैद्यक किंवा अन्य क्षेत्रात गुणवत्ता, शैक्षणिक पात्रता किंवा काही निकष असतात मग माध्यमांना नियमावली का असू नये ...

## पेचप्रसंग

दि. १७ डिसेंबर २०१९ रोजी रंगभूमीवरील आणि चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते नटसम्राट डॉ. श्रीराम लागू यांचे निधन झाले. आपल्या अभिनयाने त्यांनी देशपातळीवर नाव मिळवले. त्यांच्यावर दि. १८ डिसेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र टाइम्स या मोठ्या दैनिकात 'तेजस्वी अभिनयाचा सूर्य' असा लेख प्रसिद्ध झाला. तोच लेख तीन मराठी वृत्तपत्रात लेख किंवा अग्रलेखाचा भाग म्हणून दुसऱ्या - तिसऱ्या दिवशी प्रकाशित झाला. त्यात मुंबईहून प्रसिद्ध होणारे 'प्रहार', 'पुण्य नगरी' व लातूरचे सायंदैनिक 'भूकंप' यांचा समावेश होता. मोठ्या वृत्तपत्रातील लेख अन्य वृत्तपत्रे त्या वृत्तपत्राला किंवा मूळ लेखकाला श्रेय न देता पूर्वसंमतीशिवाय जसेच्या तसे पुर्नप्रकाशित (कॉपीपेस्ट) करतात असे प्रकार सरार्स वाढू लागले आहेत. याला चौर्य कर्म म्हणावे की झटपट जर्नालिझम म्हणायचे ...

महाराष्ट्रात दि. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना, काँग्रेस आणि काँग्रेस अशा तीन प्रमुख पक्षांचे महाविकास आघाडी सरकार स्थापन झाले. या सरकारमधील अनेकांचा एक लाख दहा कोटी रुपये खर्चाच्या मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनला विरोध आहे हे सर्वश्रुत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या

प्रतिष्ठेचा हा प्रकल्प आहे व जपानने अत्यल्प व्याज दराने कर्जही भारताला देऊ केले आहे. मुंबई विकास महानगर विकास प्राधिकरणाचे आयुक्त ए. राजीव यांच्या मुंबईतील 'सकाळ', 'पुढारी' व 'नवभारत' या तीन वृत्तपत्रातहि. २७ डिसेंबर २०१९ रोजी मुलाखती प्रसिद्ध झाल्या. बुलेट ट्रेनचे काम सुरूच राहणार व वांद्रा - कुर्ला संकुलात टर्मिनस उभारण्यासाठी लवकरच अठराशे कोटी रुपयांची निविदा काढणार, असे मुलाखतीत म्हटले होते. दुसऱ्याच दिवसशी राजीव यांनी कोणाही पत्रकाराला मुलाखत दिलेली नाही, असा खुलासा एमएमआरडीएने केला. बुलेट ट्रेनचा एमएमआरडीएशी काहीही संबंध नाही, असे त्या खुलाशात म्हटले होते. मग आयएएस असलेल्या आयुक्तांच्या नावावर तीन मोठ्या वृत्तपत्रात त्यांची मुलाखत कशी प्रसिद्ध झाली ... राजीव यांचे नाव चुकीच्या खातरजमा करून घेणे आवश्यक आहे, असे एमएमआरडीए म्हटले आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस या भाजपचे सरकार सत्तेवरूनगेल्यापासून ट्विटरवरून सतत राजकीय भाष्य करून प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्या अक्सिस बँकेत नोकरीला आहेत. नागपुराला असताना त्या बँकेत अधिकारी होत्या, त्यांचे पती मुख्यमंत्री झाल्यावर त्या मुंबईला वास्तव्याला आल्या आणि अक्सिस बँकेच्या थेट उपाध्यक्ष म्हणून त्यांना बढती मिळाली. फडणवीस यांच्या कारकिर्दीत राज्य सरकारची दोन लाख पोलिसांची वेतनाची खाती ही सरकारी बँकेतून अक्सिस बँकेतून वळवली गेली, हा योगायोग म्हणायचा की आणखी काही. अकरा हजार कोटी रुपयांचे हे वार्षिक वेतन आहे. शिवाय अन्य सरकारी खातीही या खाजगी बँकेत वळवली गेली. फडणवीस सरकार पायउतार झाल्यापासून अक्सिस बँकेतील महाराष्ट्र सरकारची खाती पुन्हा स्टेट बँकेत वर्ग होणार म्हणून मीडियातून चर्चा सुरु झाली. ठाकरे सरकारने कोणताही निर्णय घेतला नसतानाही फडणवीस मात्र आपल्या करताना कोणताही गैरव्यवहार झाला नाही, म्हणून सारखे खुलासा करीत राहिले. नेमका हा काय प्रकार आहे याचा शोध मीडियाने कधीही घेतला नाही. मात्र अमृता फडणवीस यांचे ट्विटवरून केले मुख्यमंत्री ठाकरेंवरील शरसंधानाला मोठी प्रसिद्धी मिळत राहिली. आपली पत्नी नोकरी करते त्या खाजगी बँकेत महाराष्ट्र सरकारची हजारो कोटी रुपयांची खाती हलवण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी का घेतला यावर चर्चा कधीच झाली नव्हती. त्या पारदर्शक कारभारावर कधी कोणी ब्र काढला नव्हता. मग सरकार बदलल्यावर राष्ट्रीयकृत बँकेच्या पुळका का यावा, याचाही मीडियाने कधी शोध घेतला नाही. अमृता फडणवीस या अक्सिस बँकेच्या कॉर्पोरेट हेड आहेत. त्या म्हणतात - अशा प्रकारे बँकेतील खाती वळविण्याचा निर्णय घेऊन सरकार मला व देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य करीत आहे. वाईट नेता मिळणं ही महाराष्ट्राची चूक नाही, पण त्या नेत्याबरोबर राहणं ही मात्र चूक आहे, असेही त्यांनी ट्विट करून ठाकरेंवर निशाणा साधला आहे. सरकारी बँकेतून खाजगी बँकेत कोट्यवधी रुपयांचा खाती वळल्यामुळे कोणाला किती लाभ झाला याचाही शोध घेण्यात मीडिया अपयशी ठरला. देशातील मोठ्या राज्यातील सत्ता गेल्यानंतर काय काय होऊ शकते ते बघायला मिळत आहे. मीडिया फक्त आपलं टीआरपी समोर बातम्या देत आहे. मोदी सरकारने नागरिकत्व दुरुस्ती कायद्यात सुधारणा करून शेजारी देशातील बिगर मुस्लिमांना देशाचे नागरिकत्व बहाल करण्याची तरतूद केल्यावर देशभर प्रक्षोभ उसळला. विशेष म्हणजे कायद्याचे समर्थक व विरोधक दोन्ही बाजू रस्त्यावर उतरल्या.

गेल्यापासून ट्विटरवरून सतत राजकीय भाष्य करून प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्या अक्सिस बँकेत नोकरीला आहेत. नागपुराला असताना त्या बँकेत अधिकारी होत्या, त्यांचे पती मुख्यमंत्री झाल्यावर त्या मुंबईला वास्तव्याला आल्या आणि अक्सिस बँकेच्या थेट उपाध्यक्ष म्हणून त्यांना बढती मिळाली. फडणवीस यांच्या कारकिर्दीत राज्य सरकारची दोन लाख पोलिसांची वेतनाची खाती ही सरकारी बँकेतून अक्सिस बँकेतून वळवली गेली, हा योगायोग म्हणायचा की आणखी काही. अकरा हजार कोटी रुपयांचे हे वार्षिक वेतन आहे. शिवाय अन्य सरकारी खातीही या खाजगी बँकेत वळवली गेली. फडणवीस सरकार पायउतार झाल्यापासून अक्सिस बँकेतील महाराष्ट्र सरकारची खाती पुन्हा स्टेट बँकेत वर्ग होणार म्हणून मीडियातून चर्चा सुरु झाली. ठाकरे सरकारने कोणताही निर्णय घेतला नसतानाही फडणवीस मात्र आपल्या करताना कोणताही गैरव्यवहार झाला नाही, म्हणून सारखे खुलासा करीत राहिले. नेमका हा काय प्रकार आहे याचा शोध मीडियाने कधीही घेतला नाही. मात्र अमृता फडणवीस यांचे ट्विटवरून केले मुख्यमंत्रीयापूर्वी असे कधी झाले नव्हते. नव्या नागरिकत्व दुरुस्ती कायद्याने देश दुभंगला गेल्याचे चित्र दिसले. मुस्लिमांनी तसेच भाजप विरोधकांनी कायद्याला विरोध म्हणून देशभर शक्तिप्रदर्शन केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून सत्ताधारी पक्षाने कायद्याच्या समर्थनार्थ मोर्चे काढले. मुंबईत आयआयटीबीच्या विद्यार्थ्यांनी कायद्याच्या समर्थनार्थ रस्त्यावर येऊन घोषणा दिल्या. त्याचा फोटो महाराष्ट्र टाइम्सच्या मुंबई आवृत्तीत २७ डिसेंबर २०१९ ला प्रसिद्ध झाला आहे. फोटोच्या खाली मात्र कायद्याला विरोध करण्यासाठी विद्यार्थ्यांची निदर्शने अशा ओळी प्रसिद्ध केल्या आहेत. फोटोमधे विद्यार्थ्यांच्या हातात आमचा कायद्याला पाठिंबा आहे, असे फलक दिसत आहेत आणि फोटोखाली (सीएएला) कायद्याला विरोध असे म्हटले आहे. याला काय म्हणावे ... उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर महाविकास आघाडी सरकारचा दि. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी शपथविधी झाला. यावेळी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना अशा प्रत्येकपक्षाच्या प्रत्येकी दोन मंत्र्यांचा शपथविधी झाला. त्यानंतर तब्बल महिनाभराने दि. ३० डिसेंबर २०१९ रोजी मुंबईतील विधीमंडळाच्या प्रांगणात मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. परंतु त्या महिनाभरात विस्तार कधी होणार आणि कोणत्या नेत्यांना कोणती खाती मिळणार याच्या सुरस बातम्यांचा मीडियातून रोज वर्षाव होत राहिला. मीडियातून सरकारच्या शपथविधीपासून ते मंत्रिमंडळ विस्तारापर्यंत आणि उपमुख्यमंत्रीपद कोणाला मिळणारपासून ते गृह, नगरविकास, अर्थ, महसूल खरे कोणाच्या वाट्याला येणार त्याचे रोज सर्व मीडियातून महिनाभर चर्वण सुरु होते. हे सर्व वाचकांनी माहिती देण्यासाठी होते की निव्वळ टीआरपीसाठी चालले होते.

विधानसभा निवडणुकीनंतर भाजपचे सरकार स्थापन होत नाही हे स्पष्ट झाल्यावर शिवसेनेने राजभवनवर सरकार स्थापनेचा दावा केला. आपल्याला काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांचा पाठिंबा असल्याचे त्यावेळी म्हटले. शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांच्याबरोबर दि. ११ नोव्हेंबर २०१९ रोजी राजभवनवर राज्यपालांना भेटायला गेले. काँग्रेस , राष्ट्रवादीने सेनेला आपल्या आमदारांच्या पाठिंब्याची पत्रे दिली असून शिवसेनाप्रमुखांच्या स्मृतिदिनाला १६ नोव्हेंबरला नव्या सरकारचा शपथविधी

शिवतीर्थावर (शिवाजी पार्क मैदानावर) होणार अशा बातम्या मीडियाने ब्रेकिंग न्यूज म्हणून जोरदार चालवल्या. प्रत्यक्षात शिवसेनेला काँग्रेस व राष्ट्रवादीने पाठिंब्याची तेव्हा पत्रे दिलेली नव्हती , म्हणून सेनेच्या शिष्टमंडळाला हात हलवत राजभवनावरून माघारी फिरावे लागले ही वस्तुस्थिती होती. ठोस माहिती नसताना आपण तोंडघशी पडू याचे भान तेव्हा मीडियाने ठेवले नाही.

डिसेंबर २०१९ मधे विधिमंडळाचे एक आठवडा हिवाळी अधिवेशन नागपूर येथे झाले. अधिवेशन संपताच मंत्रिमंडळाचा विस्तार होणार व कोणाला मंत्रीपदे व खाते वाटप कसे होईल याचा मीडियाने वाचकांवर भडीमार केला होता. २३ किंवा २४ डिसेंबरचा मुहूर्त म्हणून मीडियाने खूप गाजावाजा केला होता. प्रत्यक्षात त्या तारखेला काहीच घडले नाही.

महाराष्ट्रात झालेली विधानसभा निवडणूक युती विरुद्ध आघाडी अशी झाली. भाजप - शिवसेना आणि काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस असे एकमेकांच्या विरोधात लढले. निकालानंतर राज्यात युतीचे सरकार येणार हे मीडियाने गृहीत धरले होते. जनमत चाचण्याही तशाच होत्या. 'एक्झिट पोल' ही तेच सांगत होते. २८८ जागांसाठी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे एकशे पाच व शिवसेनेचे ५६ आमदार निवडून आले. त्यामुळे युतीचे सरकार पुन्हा स्थापन होणार असे चित्र होते. प्रत्यक्षात निवडणुकीपूर्वी भाजपने शिवसेनेला दिलेल्या शब्दावरून कानावर हात ठेवले. अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदाचा दिलेला शब्द भाजप पाळत नाही , हे लक्षात येताच शिवसेनेने भाजपाला पाठिंबा देण्यास नकार दिला, इथेच राजकारणाचा पोट बदलला.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येईल आणि शिवसेनेचा मुख्यमंत्री होईल अशी कल्पनाही मीडियाला नव्हती. उद्धव ठाकरे हे राज्याचे मुख्यामंत्री होतील , असे भाकीत कोणीही केलेले नव्हते. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना हे भाजपच्या विरोधात सरकार स्थापनेसाठी एकत्र येतील , असा अंदाज कोणीही बांधला नव्हता. महाआघाडी स्थापन होण्याचा घोळ तीन आठवडे चालला होता व तो लवकर संपत नव्हता त्याचा भाजपने लाभ उठवला व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना आपल्याबरोबर आणले व रातोरात दि. २३ नोव्हेंबर २०१९ रोजी देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री व अजित पवार हे उपमुख्यमंत्रीपदाची राजभवनावर शपथ घेतील हे महाराष्ट्रात कोणालाही ठाऊक नव्हते. अर्थात हे नाट्य काही अचानक घडले नसावे , पण त्या हालचालींची दिवसरात्र ब्रेकिंग न्यूज आदळणाऱ्या मीडियाला किंचितही कल्पना नव्हती. विशेष म्हणजे फडणवीस व पवार यांचे सरकार ८० तासात कोसळले याचाही अंदाज कोणी बांधला नव्हता. अजित पवारांना घेऊनही भाजपला बहुमत आणता आले नाही , यावर मीडियाने प्रकाश टाकला नाही. अजित पवार भाजपबरोबर का गेले व परत राष्ट्रवादीकडे का फिरले हे गूढ मीडियाला उकलता आले नाही.

पूर्वीच्या आघाडी सरकारमधे अजित पवार हे जलसंपदा मंत्री असताना ७० हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला, असा प्रचार करीत २०१४ च्या निवडणुकीत भाजपने मते मागितली होती. पाच वर्षे सत्तेवर राहूनही अजित पवारांवर कारवाई झाली नाही. एवढेच नव्हे तर त्यांनाच बरोबर घेऊन भाजपने सरकार स्थापनेचा प्रयोग केला. त्याच अजित पवारांना बदललेल्या परिस्थितीत चौकाशी यंत्रणेने 'क्लीन चीट' दिली. हे सर्व झटपट कसे घडले , याचा मीडियाने दितपत शोध घेतला ... अजित पवार उपमुख्यमंत्री होतात की त्यांना गृह खाते मिळते यावरच मीडियाने अधिक लक्ष्य केंद्रित केले होते. जर त्यांना 'क्लीनचिट' मिळाली असेल तर त्यांच्यावर आरोप करणाऱ्या भाजप नेत्यांचे काय ....

छगन भुजबळ आघाडी सरकारमधे सार्वजनिक बांधकाम मंत्री होते. तेही उपमुख्यमंत्री व गृहमंत्री होते. त्यांनी म्हणे १८०० कोटींचा घोटाळा केला म्हणून त्यांच्यावर फडणवीस असताना चौकशी

लावली, भुजबळ पंचवीस महिने तुरुंगात होते. त्यांची न्यायालयात सुनावणीची झाली नाही. अजून आरोप सिद्ध झाले नाहीत. एक मोठ्या राजकीय विरोधकाला विना सुनावणी दोन वर्षे तुरुंगात टाकले जाते, याविषयी मीडिया काही बोलत नाही. ते आता महाविकास आघाडी सरकारमधे मंत्री आहेत. भाजपच्या एकशे पाच आमदारांमधे काँग्रेस , राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपामधे गेलेले पन्नास तरी आमदार आहेत. ते भाजप सत्तेवर असताना त्या पक्षात गेले. पण महाआघाडी सरकारमुळे त्यांचे मनोरथ कोसळून पडले. त्यांची आता मानसिकता काय आहे, हे मीडियाने कशी शोधले नाही ... त्यांचा तर मोठा अपेक्षाभंग झाला असेल. त्याचा पाठपुरावा मीडियाने केला असे दिसेल नाही.

## अभ्यासाची उद्दिष्टे -

१) वृत्तपत्रे जबाबदारीची जाणीव ठेऊन वाचकांना माहिती देतात का हे अभ्यासणे.

२) वृत्तपत्रे माहितीची खातरजमा करून बातम्या देतात का हे तपासणे.

३) बातम्यासंदर्भात सोशल मीडिया आणि प्रिंट, इलेक्ट्रॉनिक मीडिया यातील नैतिकता अभ्यासणे.

४) वृत्तपत्रे विशिष्ट हेतूने बातम्या देतात का हे तपासणे.

५) मीडियाला नियमावलीची गरज आहे काय? याची चाचपणी करणे.

## गृहीतके -

१) माध्यमातून जबाबदारीची जाणीव ठेऊन वाचकांना माहिती दिली जाते.

२) वृत्तपत्रे माहितीची खातरजमा करून बातम्या देतात.

३) बातम्यांसदर्भात सोशल मीडिया आणि प्रिंट, इलेक्ट्रॉनिक मीडियात नैतिकता पाळली जाते.

४) वृत्तपत्रे विशिष्ट हेतूने बातम्या देतात.

५) मीडियाला नियमावलीची गरज आहे.

## संशोधन पद्धती -

या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा अवलंब करण्यात आला. प्राथमिक स्रोत - या संशोधनासाठी प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी स्तरीकरण पद्धतीने प्रत्यक्ष मुलाखतीसाठी वाचक आणि पत्रकार तसेच लोकप्रतिनिधी यांची निवड केली.

दुय्यम स्रोत - विविध दैनिकांचे अंक , संदर्भ साहित्य, पुस्तके, मासिके यांच्या संदर्भात साहित्य म्हणून वापर केला.

## निष्कर्ष -

१) माध्यमांकडून जबाबदारीची जाणीव ठेऊन वाचकांना माहिती दिली जात नाही.

२) वृत्तपत्रे माहितीची खातरजमा करून बातम्या देतात. परंतु सोशल मीडियावर माहितीची खातरजमा न करताच 'फॉरवर्ड' करण्याचे प्रमाण मोठे आहे.

३) प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मीडिया जबाबदारीने बातम्या देतात. तसेच नैतिकता पाळली जाते.

४) काही वृत्तपत्रे विशिष्ट हेतूने बातम्या देतात.

५) मीडिया घाईघाईने, विशिष्ट हेतूने किंवा माहितीची खातरजमा ना करता कोणची तरी एकच बाजू धरली जाते. काल्पनिक बातम्यांचा जोर वाढत आहे. त्यामुळेच मीडियासाठी नियमावलीची गरज आहे.

६) मीडियातील काहीजण फक्त आपला टीआरपी समोर ठेऊन बातम्या देत आहेत.

७) मीडियातून काही राजकीय बातम्यांचे बरेच दिवस चर्वण सुरु असते.

८) ठोस माहिती नसताना मीडियाकडून 'ब्रेकिंग न्यूज' म्हणून सनसनाटी बातम्या दिल्या जातात. पण सत्य परिस्थिती व वास्तवात समोर आल्यानंतर मीडिया तोंडघशी पडल्याचे दिसून येते.

९) मीडियाकडून वाचकांवर अनावश्यक बातम्यांचा भडीमार केला जातो.

## शिफारसी -

१) माध्यमांनी माहितीची खातरजमा करून बातम्या द्याव्यात.

२) माध्यमांनी अनावश्यक बातम्या ब्रेकिंग न्यूज किंवा सनसनाटी बातम्या म्हणून देऊ नये.

३) माध्यम प्रमुखांनी व वरिष्ठानी आपल्या वार्ताहारांना नैतिकतेचे धडे द्यावेत.

४) माध्यमांनी अनावश्यक बातम्यांचा भडीमार टाळावा.

५) माध्यमांनी बातम्यांबाबत आपली आदर्श नियमावली तयार करावी.

## संदर्भ -

Tilak, G. (2019). Freedom of Expression in the Digital Age.

Tilak, G. (2020). Legal Safeguards to Press Freedom.

१) महाराष्ट्र टाइम्स - ऑक्टोबर, नोव्हेंबर २०१९

२) प्रहार - ऑक्टोबर, नोव्हेंबर २०१९

३) पुण्य नगरी - ऑक्टोबर, नोव्हेंबर २०१९

४) नवशक्ति - ऑक्टोबर, नोव्हेंबर २०१९

५) हिंदुस्थान टाइम्स - ऑक्टोबर, नोव्हेंबर २०१९

६) टाइम्स ऑफ इंडिया - ऑक्टोबर, नोव्हेंबर २०१९